म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ८२६

REFBK-0001109
REFBK-0001109

म. ग्रं. सं. ठाणें
य निबंध
नं. 428

...य-समाजानें पहिलें बक्षीस दिलेला निबंध.

आपणांतील

# करमणुकीचे प्रकार.

REFBK-0001109

"षष्ठ भाग त्वमपि दिवसस्यामनश्छंदवर्ती"

—शाकुंतल.

लेखक व प्रकाशक,

गजानन गोविंद नाईक.

ता. २२—८—१५.] [सर्व हक्क स्वाधीन.

किं० २ आणे.

लवकरच प्रसिद्ध होणारीं पुस्तकें

# प्रेमाचा संन्यास कीं संन्यासाचें प्रेम?

दैवी प्रेमाची कल्पना आणून देणारें **एक सामाजिक चित्र** या कादं
बरींत रेखाटलें आहे.

श्रीमत् भगवद्गीतेंतील

# सूत्रमय वाक्यें.

श्रीमत् भगवद्गीतेचीं पानें वारंवार चाळीत असतांना 'सूत्रमय वा
'संन्यास,' 'योग,' 'योगारुढ,' 'संन्यासी,' 'त्याग,' इत्यादि शद्बांच्या, **गी**
स्पष्ट रीतीनें विशद केलेल्या, व्याख्या व निरनिराळे सिद्धांत—जे आढळले
ह्या ग्रंथांत ग्रथित केले आहेत.

# अणजूरकर घराण्याचा साद्यंत इतिहास

ह्यांत सामान्यतः ज्ञातीची पूर्वपीठिका, ज्ञातीच्या इतिहासांत ह्या घराण
स्थान, त्याची सन १७३९ तली कामगिरी, इनाम वगैरेबद्दलचे त्याचे हक्क, त
तील प्रसिद्ध पुरुषांचीं कृत्यें, वंशावळ इत्यादि माहिती येणार आहे. आप
**पाठारे क्षत्रिय** ज्ञातीचा, किंवा एखाद्या प्रसिद्ध घराण्याचा, एकहि इति
आजपर्यंत उपलब्ध नाहीं. तरी, ज्ञातिबांधवांस व अणजूरकर घराण्यांत
प्रत्येक इसमास अशी विनंति आहे कीं, ज्यांचेजवळ ज्ञातीबद्दल, किंवा ह्या घ
ण्याबद्दल, जी माहिती असेल ती त्यांनीं मजकडे पाठविल्यास फार फार उप
होतील.

लेखक —**गजानन गोविंद ना**
स्टेशनरोड—**ठा** .

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—

**ठाणें—श्रीदत्त एजन्सी**
किराणा मालाचे व्यापारी व कमिशन् एजन्ट्स्.
**धि ठाणा बुक-डेपो**, बाजारपेठ.
**कल्याण**—जोशी यांचें स्वदेशी मालाचें दुकान, पाराजवळ.

प्रस्तावनेदाखल

# दोन शब्द

मींच लिहावें, अशी प्रस्तुतच्या निबंध–लेखकाची इच्छा व आग्रह; परंतु ह्या ' करमणुकीच्या प्रकारा'ला अशा कोणत्या आणखी प्रास्ताविक दोन शब्दांची जोड दिली असतां, त्यामुळें, निबंध–वाचकांची–घटकाभरच कां होईना—' करमणूक 'होईल, हें कळत नाहीं. लेखकानें आपल्या निबंधांत, शक्य तेवढा, ' आपणांतील करमणुकीच्या प्रकारां'चा विचार सांगोपांग केला आहे; तो वाचकांच्या निदर्शनास येईलच. प्रस्तुत निबंधकाराच्या, आजवर गुलदस्तांत असलेल्या, कांहीं कृतींपैकीं, विद्वज्जनसमूहापुढें भीतभीतच आणिलेली, ही त्याची प्रथम कृति होय. कोणाहि लेखकाच्या कोणत्याहि कृतींत दोष असणें स्वाभाविक आहे; तथापि, '**एकोहि दोषो गुण सन्निपाते**—' या न्यायानें, त्याच्या कृतींत, गुणसमुच्चयाव्यतिरिक्त, आढळून येणारा एखाददुसरा दोष केव्हांहि क्षम्यच आहे.

सदरील निबंधांत लेखकानें ' करमणुकीची व्याख्या करून, मनाला तिची आवश्यकता केव्हां असते याचें विवेचन थोडक्यांत मुद्देसूद केलें आहे. 'करमणूक' ही केव्हांहि, कोणालाहि, हवीच आहे. इंग्रज तत्त्ववेत्ता **सर्वंट्स्** (Cervantes) ह्मणतोः–"धनुष्य प्रत्यंचावर ओढून एकसारखें वांकवून ठेवणें कधींहि श्रेयस्कर नसतें. त्याला कामापुरतेंच वांकवून नंतर सर्वकाल ताठच ठेवणें धनुर्विद्येच्या दृष्टीनें अत्यावश्यक असतें. याच नियमानुसार मानवी स्वभावाला नेहमीं श्रमांच्या प्रत्यंचाखालीं वांकून राहणें खपत नाहीं. त्याला करमणुकीसाठीं नेहमीं ताठच ( मोकळें ) ठेवणें इष्ट असतें. रंजन हें मानवी स्वभावाचें जीवनच होय. " पण तें नियमबद्ध असावें. "Recreation should not be our business, but fit us for it—" असें एका तत्त्ववेत्त्याचें ह्मणणें आहे;—अक्षरशः खरें आहे. वरील बहुमोल वचनाचा मतितार्थ


इतकाच कीं, आधीं कर्तव्यदक्षता व तदनंतर, फावल्यावेळीं, 'करमणूक.' 'करमणूक' शब्दाची व्याख्या—'खरी करमणूक'—माझ्या मतें, अशीच असावयास पाहिजे आहे. नाहींपेक्षां, हातीं घेतलेल्या कामाची बेपरवा होत आहे, आल्यागेल्याची वास्तपुस्त नाहीं, यजमान आपले खुशाल माडीवरील दिवाणखान्यांत मित्रमंडळीसह चकाट्या पिटीत व खिदळत बिझिक्‌चा डाव खेळत आहेत, किंवा तासचेतास सोंगट्यांच्या फेंकाफेंकीचा धिंगाणा घालून आपल्या हलकल्लोळानें सारें घर—किंबहुना, सारी आळी—दणाणून टाकीत आहेत, अशाच प्रकारचे हल्लींचे कांहीं "करमणुकीचे प्रकार" आपल्यांत राजरोस चालू असल्याचा अनुभव आहे! असें नसावें. ती खरीखुरी 'करमणूकच' नव्हे. 'करमणूक' कशी असावी—याविषयीं थोडक्यांत लिहावयाचें ह्मणजे—ती कानाला मधुर, नेत्रांना आल्हादकारक, शरीराला स्पर्शसुखद व बळकटी आणणारी, मेंदूला पोषक, बुद्धीला वर्धक व ज्ञानदायक, अशी असावी. नाहींतर, 'करमणुकी' पासून आजवर अनेक अनर्थ ओढवल्याची इतिहास मधूनमधून साक्ष देत आहे. 'करमणूक' करितां करितां, थट्टेला प्रारंभ होऊन, या सर्वांचें पर्यवसान अखेर तंटेभांडणांत व मारामारींत झाल्याचीं शेंकडों उदाहरणें घडलीं आहेत, आज घडत आहेत! असें स्थित्यंतर घडवून आणणारी किती अधमपणाची वृत्ति ही!! 'करमणुकी'करितां लालचावलेल्या शहाण्यानें आपलें पाऊल जपून टाकावें.

शेवटीं, **श्रीगजानन**कृपाप्रसादानें, **गजाननाला**—निबंधलेखकाला—विविधविषयग्रंथरचनेच्या कामीं उत्तरोत्तर अधिक स्फूर्ति होऊन, त्याचे हातून चिरकालीन वाङ्मयसेवा घडावी; इतकें इच्छून, येथेंच या प्रस्तावनेदाखल लिहिलेल्या दोन शद्बांची परिसमाप्ति करण्यांत विशेष आनंद मला वाटत आहे!

**दादर**—मुंबई,
ता. १५ आगष्ट १९१५.

**आत्माराम मोरेश्वर पाठारे.**

कै० खंडेराव वामनराव नाईक
इनामदार, अणजूर.



**जन्मः**-मार्गशीर्ष शु. १श. १८१२ **मृत्युः**-फाल्गुन शु. १४श. १८३६

निज संवगड्यांस चटका लावुनि अल्पावधींत परलोका ।
गेला जो एकाकी मजला मारीत ठेविलें हांका ॥ १ ॥
मज्ज्येष्ठ—बंधु—तनया **खंडेराया** तया **समर्पीतों** ।
**वाङ्मय-सुम-माला हीं**; सु-जना अल्पेंहि तोष बहु होतो ॥२॥

ग. गो. नाईक.

प्रेमिअर आर्ट प्रिंटिंग वर्क्स, कोट, मुंबई.

ॐ

श्रीराम प्रसन्न !

# आपणांतील

# करमणुकीचे प्रकार.

' प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः '

**प्रिय अध्यक्षमहाराज व सभावृंदहो !**

पाठारे क्षत्रिय ज्ञातीला ललामभूत व ह्मणून अति प्रिय असलेल्या कर्मवृद्ध, अर्थात् ज्ञानवृद्ध व विज्ञानवृद्ध क्षात्र्यैक्य-समाजानें प्रसिद्ध केलेल्या हस्त-पत्रकाला अनुसरून निबंधाकरितां ठरविलेला विषय-- " आपणांतील करमणुकीचे प्रकार "--माझ्या ह्या आजच्या निबंधाला कारण आहे.

## विषयप्रवेश

निबंधाचा विषय वाचल्याबरोबर माझ्या मनांत पहिला विचार हा उद्‌भूत झाला कीं, ' आपणांतील ' ह्मणजे कोणामधील ? आपल्या ' ज्ञातींतले,' कीं ' हिंदुसमाजां ' तलें ? अथवा, एकंदर ' हिंदी लोकांतले ? ' अशीहि शंका आली कीं, कदाचित् ' आपणांतील ' हा शब्द ' मानवकुलदर्शकहि ' असावा. एक वेळ अशी भावना झाली कीं, ' आपणांतील ' ह्मणजे ' पुरुष--जातींतील ' होय. ' आपणांतील ' ह्मणजे ' आपल्या ज्ञातींतील ' अथवा ' पुरुष-जातींतील ' इतका आकुंचित अर्थ--अथवा, सर्व मानवकुलांतील इतका अति

विस्तृत अर्थ-न घेतां, सध्यां आपल्या डोळ्यांपुढें रात्रंदिवस असलेला हिंदु अथवा हिंदी समाज ह्यांत रुढ असलेले, असा अर्थ समजून पुढील प्रतिपादन मी करीत आहें.

## विषयविभाग

वरील अर्थ घेऊन प्रतिपादन करण्यास सुरवात करितांच पहिली गोष्ट ही ध्यानांत येते कीं, ह्या 'प्रकाराचे' दोन भाग पाडिले जातील. एक पुरुषांचे करमणुकीचे प्रकार, व दुसरे स्त्रियांचे करमणुकीचे प्रकार. कारण, पुरुषांचे करमणुकीचे मार्ग व स्त्रियांचे करमणुकीचे मार्ग बहुतांशीं भिन्नच आहेत. अर्थात् वरील विषयाचे 'पुरुषांचे' व 'स्त्रियांचे' असे दोन भिन्न विभाग होत. तेव्हां, निबंधाच्या विषयाचें प्रतिपादनहि दोन विभागांतच केलें पाहिजे.

## व्याख्या

करमणुकीचे प्रकार निवेदन करण्याच्या अगोदर 'करमणूक' शब्दाची व्याख्या आपल्याला देतां आल्यास, त्या व्याख्येच्या आधारानें एकंदर विषयविवेचन चांगलें साधेल हें खरेंच. तेव्हां, तसाच प्रयत्न करितों. 'करमणूक' हा शब्द उच्चारिल्याबरोबर, अथवा तो शब्द आपल्या कानावर आल्यानंतर, किंवा त्या शब्दाची स्मृति झाल्याबरोबर, आपल्या मनांत कोणती कल्पना येते, त्याचा विचार आपण निरीक्षणपूर्वक केल्यास, ती कल्पनाच ही बरोबर व्याख्या होय. शब्दांत त्याचें योग्यसें प्रतिबिंब उमटणार नाहीं. तरी, असें ह्मणतां येईल कीं, कर्तव्य, आशा, इच्छा, इत्यादि आशापाशशतांनीं जखडून अहर्निश कामाच्या रगाड्यास जोडलेल्या मनाची त्या बंदीवासांतून स्वच्छंदाच्या हवेंत जी सुटका, ती स्थिति 'करमणूक' होय. ज्या स्थितींत मनाच्या वृत्ति, गरजांची व इतर तशा बंधनांची कोंडी फोडून, मोकळ्यापणानें विहरतात, ती स्थिति 'कर-

मणूक.' अशी स्थिति–मनाची पाशमुक्त स्वैरवृत्ति–ज्या उपायांनीं आणितां येते, ते उपाय 'करमणुकीच्या प्रकारां'खालीं येतात. केव्हां केव्हां मात्र हें मनाचें स्वच्छंदीपण निरुपद्रवी, हितकारी व सात्विक वृत्तींचें न राहतां अनाचारी, अहितकारी, अनीतिमूलक व नीच वृत्तीचें असतें. अशा वेळचे ते 'करमणुकीचे प्रकार' हि अनीतिमूलक व अमानुष असे असतात.

## करमणुकीची आवश्यकता

अशा रीतीनें कार्यमग्न असलेलें मन कार्यांतून काढून त्याला थोडीशी मोकळीक देणें आवश्यक आहे कीं काय, ह्याचा विचार केला पाहिजे. मन नेहमीं एकाच कार्यात मग्न राहूं शकेल काय, हा पहिला प्रश्न. मन एकाच गोष्टींत जर मग्न राहूं शकतें, तर, 'करमणूक' उत्पन्न होतीचना. मन फारच चंचल असल्यामुळें तें एका ठिकाणीं फार वेळ राहूं शकत नाहीं. पिशाचबाधा झालेल्या मर्कटाप्रमाणें तें अनेक ठिकाणीं हिंडत असतें; व एकाच गोष्टीकडे फार वेळ तें लाविल्यास लागलेंच कंटाळतें. तें एकदां कंटाळलें कीं, त्याला बाहेरची हवा घ्यावयास सोडावें लागतें. नाहीं तर, तें मग कशाच्याहि उपयोगीं पडूं शकत नाहीं. ज्याप्रमाणें अन्नाचा पालट करावाच लागतो, तेव्हां शरीर समावस्थेंत राहतें; तसेंच मनाचे विषयहि वेळोवेळीं पालटले तरच ते समावस्थेंत राहतें. 'करमणुकी'चा जन्म मनाच्या विषयपालटांत झालेला आहे. अर्थात् मनाचें मनपण ठेवावयाचें असल्यास 'करमणूक' ही जीवंत असावयास पाहिजे आहे. एका विषयावरून–एका कामांतून–काढून मन दुसरीकडे लाविल्यास, आपणाला नाविन्यामुळें एक प्रकारचा विशेष आनंद होतो; ही गोष्ट प्रत्येकाच्या अनुभवास आली असेलच. पण दुसराहि विषय पहिल्या इतकाच रुक्ष असेल, तर, त्या ठिकाणींहि मन विशेष रंगणार नाहीं. अर्थात् पहिल्या रुक्ष विषयांतून निघाल्यावर मनाला दुसरी जागा

विशेष आनंददायी, सौकर्याची व अनभ्यासाची असली पाहिजे. ह्या दुसऱ्या जागेंत त्याला स्वैरवृत्तीनें खेळतां बागडतां आलें पाहिजे. असल्या जागाच ' करमणुकी ' होत. एखाद्या महान् शक्तिवान् मनाच्या माणसाची करमणूक ह्मणजे पहिल्या इतकाच रुक्ष दुसरा विषयहि असूं शकतो.

## देश, काल, वयमान व संस्कृतीप्रमाणें करमणुकीची विविधता

एकाच प्रकारची करमणूक सर्व देशीं, सर्व कालीं, सर्व संस्कृतींत व सर्व वयोमानीं असणें शक्य नाहीं. इंग्लंडांत जे करमणुकीचे अथवा मनाचें आराधन करून त्याचें स्वास्थ्य ठेवण्याचे प्रकार आहेत, तेच प्रकार हिंदुस्थानांत असतीलच असें नव्हे. चंद्रगुप्ताच्या कालीं अस्तित्वांत असलेले, अथवा शिकंदर-सीझरच्या अमदानींत झालेले, द्वंद्वयुद्धाचे (tournments) प्रकार आजहि अस्तित्वांत आहेत असें कोण ह्मणेल ? परवां त्रावणकोरच्या राज्यांत सांपडलेल्या अत्यंत रानटी संस्कृतींतल्या लोकांचे करमणुकीच प्रकार व भौतिक शास्त्रांनीं आपली पराकाष्ठा करून मिळविलेल्या उत्तम संस्कृतींतल्या लोकांचे करमणुकीचे प्रकार एकच का ? कधींही नव्हत. आपल्याच हाताचा आंगठा चुंबून स्वतःची करमणूक करून घेणारा धाकटा **बाळू**—व क्रिकेटची ब्याट फिरवीत व बॉल धुडकावीत 'हिंदुजिमखान्या'कडे झुकत चाललेला प्रसिद्ध बॉलर **बाळू**—ह्यांचे करमणुकीचे प्रकार एक नव्हत. अर्थात् देश, काल, संस्कृति व वयमान ह्यांत ज्या प्रकारचें भिन्नत्व असेल, त्याप्रमाणें करमणुकीचे प्रकार भिन्नच असणार.

## करमणुकीचें सामान्य निरूपण

वरील विवेचनावरून हें ध्यानांत येईल कीं, शांत मनाला ज्यापासून समाधान, शांति व हुशारी वाटेल—तें रमेल–ती ' करमणूक.'

[stamp]

ही करमणूक विविध प्रकारची असते. आज ज्यापासून आपल्या मनाला करमणूक होत आहे त्यापासून उद्यांहि होईलच, ही कल्पना सत्य नव्हे. आज मन ज्या परिस्थितींत आहे त्याच परिस्थितींत तें नेहमीं असेल हें गृहीत धरितां यावयाचें नाहीं. मनाच्या लहरीवर करमणुकीचा बराच भाग अवलंबून असतो. मनाच्या सुस्थितीवर शरीराचे व्यवहार व जीवात्म्याचें कार्य चाललेलें असतें; व करमणुकीच्याच पराक्रमामुळें मन सम व सुस्थित असतें; नाहीं तर, मनाच्या विषम व अस्थित अवस्थेमुळें सर्व व्यवहार केव्हांच वैकुंठ-नगरीस गेले असते! अर्थात् मनाची संस्कृति ग्राम्य असेल, तर, मनाला समाधान देण्याचे प्रकारहि ग्राम्य असतील. मनाची संस्कृति उच्च दर्जाची असेल, तर, करमणुकीचे प्रकार उच्च व नीतिमत्तेचे असतील. मनाची ओढ क्रौर्य-कर्माकडे असेल, मनाला खेळ प्रिय असतील, शौर्याकडे मनाचें वळण असेल, किंवा सामान्य आरामाकडे मन धांवत असेल, तर, त्याचे स्वतांला करमणूक करून घेण्याचे प्रकार त्या त्या मन:स्थितीबरहुकूमच तें शोधून काढील. अर्थात् करमणुकीचे प्रकारहि अनंत होतील. प्राचीनकाळीं अनेक प्रकार निघाले असतील व लयासहि गेले असतील. हल्लीं अनेक असतील, तेहि कालांतरानें नष्टदशेप्रत जाऊन त्यांच्या जागीं इतर दुसरे रुढ होतील. जसजसें मन उत्क्रान्त होईल तसतसे करमणुकीचे प्रकारहि उत्क्रान्त होतील व त्यांचें स्वरूपहि परिणत होत जाईल. अगदीं प्राचीनकाळीं करमणुकीचे जे प्रकार रुढ होते, त्यांचा विचार केल्यास, ते हल्लीं आपणांस अगदीं किळसवाणे, अश्लील वा अमानुष वाटतील. त्यांची नुसती कल्पनाहि भीतिप्रद होईल; मग त्यांपासून हल्लीं करमणूक होणें दूरच राहिलें. पण त्या वेळीं ते प्रकार खरोखरच करमणुकीच्या लायक होते; कारण, त्या वेळची जनतेची मन:स्थितिच तशी होती.

जसजशी मनःस्थिति बदलत गेली तसतसे करमणुकीचे प्रकारहि बदलत गेले. द्वंद्वयुद्धें खेळणें, एडक्यांच्या टकरा लावणें, एखाद्याचा सहज वध करणें, महंमद तघलघासारख्यानें सहज प्रजेपैकीं ५।५० माणसांचे रोज आपल्या करमणुकीखातर बळी घेणें, हे व असेच दुसरे प्रकार प्राचीनकाळीं चालू होते. शिवाय, हिंस्रपशूंबरोबर झटापटी, हेंहि मनाचें समाधान करून घेण्याचेच मार्ग होत. प्राचीनकाळीं मनाच्या बौधिक भागाकडे बरेंच दुर्लक्ष असे, त्यामुळें त्यावेळच्या करमणुकीच्या प्रकारांत शक्तीचाच विशेष भर असे. पण पुढेंपुढें मनाच्या बौधिक भागाकडे लोकांचें लक्ष लागल्यामुळें करमणुकीचे बौधिक प्रकारहि अस्तित्वांत येऊं लागले. प्राचीनकाळीं करमणुकीचे मार्ग अश्लीलपणाचे असावेत, ह्याची साक्ष हल्लीं सौम्यपणांत असलेला शिमगासण सहज देईल. हल्लींहि अश्लील प्रकार नाहींत असें नाहीं; पण ते पूर्वींच्या इतके क्रौर्याचे, शौर्याचे किंवा अश्लील असे नाहींत. त्यांत जनसुधारणेमुळें पुष्कळ उत्क्रान्ति झाली आहे. उद्यानें, खेळ, गायन, वादन, नृत्य हे प्रकार पूर्वीं होते व हल्लींहि आहेत; तरी, त्यावेळच्या प्रकारांत व आजच्या प्रकारांत महदंतर पडलें आहे.

## परिणामानुरोधानें विभाग

हल्लीं आपण ज्या मार्गांनीं करमणूक करून घेतों त्याचा विचार केल्यास आपणांस दिसून येईल कीं, त्यांत पुष्कळच प्रकार आहेत. त्या प्रकारांच्या परिणामाकडे, किंवा त्यापासून साध्य होणाऱ्या दुसऱ्या फायद्याकडे, लक्ष दिल्यास कोणते विभाग पडतात तें पाहूं या. कांहीं प्रकार असे आहेत कीं, त्यामुळें मनाला आनंद मिळून शरीराला उत्तम प्रकारचा आराम मिळतो. हे मार्ग उघडच्या हवेंतले खेळ होत. ह्या खेळांमुळें मनःप्रसाद हा करमणुकीचा मुख्य फायदा मिळतोच, पण शारीरिक स्वास्थ्यहि मिळतें. मानसिक व शारीरिक अशीं दोन्हीं कार्यें ते

करितात. कांहीं असे असतात कीं, मनाची करमणूक करून बुद्धीला-हि काम देतात. त्यांच्यामुळें बुद्धि तीव्र होते. त्या खेळांमुळें मानासिक व बौधिक-दोन्ही करमणुकी साध्य होतात. कांहींच्यामुळें मेंदूला कार्य करावें लागतें व कांहीं करमणुकीच्या प्रकारांत 'एक पंथ दो काज' ह्या न्यायानें ज्ञानप्राप्ति व ज्ञानवृद्धि होत असते. परस्परसंघटन, परस्परप्रेम, दळणवळण वगैरे हल्लींच्या करमणुकीच्या प्रकारांतलीं प्रधान अंगें होत. पूर्वी करमणुकीच्या प्रकाराचें प्रधान अंग शूरत्व हें होतें. त्याची जागा वरील गोष्टींनीं पतकरिली आहे. कांहीं करमणुकीचे प्रकार अद्यापिहि असे आहेत कीं, त्यांच्यांवर अश्लीलपणाचा शिक्का खुशाल मारावा. हे प्रकार खालच्या वर्गांत आहेतच, पण शिष्ट ह्मणवून घेणाऱ्या विशिष्ट व वरच्या वर्गांतहि प्रच्छन्नरूपानें ते वास करीत आहेत. एकंदरींत, हल्लींच्या करमणुकीचें स्वरूप खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. कानाला मधुर, नेत्रांना आल्हादकारक, शरीराला स्पर्शसुखद व बळकटी आणणारें, मेंदूंना पोषक, बुद्धीला वर्धक व ज्ञानदायक, अश्लील मनाला अश्लील आनंद देणारें—एवंच, तें सर्वांगानें पूर्ण आहे.

## इंग्रजी व हिंदी पद्धतींचे करमणुकीचे प्रकार

पूर्वीपासून आपल्यांत जे करमणूक करून घेण्याचे मार्ग आहेत त्यांत इंग्रजी पद्धतीचे पुष्कळ नवीन मार्ग शिरले आहेत. नवीन शिरलेल्या मार्गांत बौद्धिक सुधारणेचे पुष्कळ आहेत. शरीराला व्यायाम देणारेहि बरेच आहेत. सार्वजनिकरीत्या मोठ्या जनसमूहानें एकदम करमणूक करून घेण्याचे प्रकार, माझ्या मतें, इंग्रजींमुळेंच बहुतांशीं आपल्यांत आलेले आहेत. पण ह्यावरून आमच्यांत पूर्वी सार्वजनिक करमणुकीचे प्रकार मुळींच नव्हते, असे मी प्रतिपादन करूं इच्छितों असें नव्हे; तरी पण हल्लीं आपण ज्या मार्गांनीं आपली करमणूक

करून घेतों ते मार्ग पाहिल्यास आपणांस असें दिसून येईल कीं, हिंदी पोशाख चढविलेले ते इंग्रजी प्रकार होत. आपले करमणुकीचे प्रकार ह्मणजे हिंदी व इंग्रजी यांचें मिश्रण होय.

## प्रकारांचें वर्गीकरण

आतांपर्यंत सामान्यत्वेंकरून विवरण झालें. ह्यापुढें आपणांत सध्यां रुढ असलेले करमणुकीचे प्रकार सांगून, क्रमशः त्यांचें विवेचन करूं; व त्याकरितां आधीं पुरुषांचे करमणुकीचे प्रकार घेऊं. पुढील विवेचन समजण्यास सुलभ जावें ह्मणून प्रकारांचें वर्गीकरण वंश-वृक्ष-पद्धतीनें खालीं मांडितों:—

**करमणुकीचे प्रकार**

- ( १ ) पुरुषवर्गांचे
  - (१) सुशिक्षितांचे.
  - (३) मुलांचे.
  - (२) अशिक्षितांचे.
- ( २ ) स्त्रीवर्गांचे
  - (१) सुशिक्षित स्त्रियांचे.
  - (३) मुलांचे.
  - (२) अशिक्षित स्त्रियांचे.

## पुरुषवर्गांचे प्रकारः—प्रकार १ ला.

सुशिक्षितांचे वा अशिक्षितांचे करमणुकी करून घेण्याचे जे प्रकार आहेत, त्यांत सहज जे भाग पडतात ते वर ' परिणामानुरोधानें विभाग' ह्या सदराखालीं सांगितले आहेत. क्रिकेट, तालीमखाने, लॉंटनीस, हॉकी, फुट्बॉल, आट्यापाट्या, खोखो, रेसीस्,( शर्यती ) इत्यादि प्रकारच्या करमणुकींच्या मार्गांनीं मनाला करमणूक होऊन, उत्तम प्रकारचा शरीरास व्यायाम होतो; शरीराला सुस्थितपणा देणारी शुद्ध व मोकळी हवा त्या प्रकारांपासून मिळते. अशा प्रकारची करमणूक करून घेत-

ल्यानें, व्यवसायांमुळें उत्पन्न झालेला थकवा नाहींसा होतो व शरीर-सुधारणा होऊन आणखी हुशारी येते. मुलांत व तरुणांत हे करमणुकीचे प्रकार तर विशेष रुढ असतात. इंग्लंडांत अगदीं वृद्धदेखील ह्यां-पैकीं एखादा करमणुकीचा प्रकार रोज करीतच असतात. खेड्यापा-ड्यांत लहान मुलांचे खेळ ह्मणजे आट्यापाट्या, खोखोच्या जोडीस लंगोरी, विटीदांडू, हे असतात. कांहीं ठिकाणीं शहरांतल्या तरुणांनाहि विटीदांडू बराच आवडूं लागला आहे. अशिक्षित(खेडूत) लोकांत आट्या-पाट्या, तालीमखाने व कुस्तींचे अखाडे हेच मार्ग विशेष आहेत. सुशिक्षितांपैकीं बरेच वकील, शाळामास्तर, लॉनटेनीससारखे करमणु-कीचे प्रकार अमलांत आणूं लागले आहेत. क्रिकेट, लॉनटेनीस, वगैरेचे जिमखाने हल्लीं जिकडेतिकडे अस्तित्वांत येत आहेत व क्लब्स स्थापन होत आहेत. आपल्याकडे तालीमखाने तर पूर्वापार चालू आहेत व कांहीं कांहीं प्रसिद्ध तालमी आहेत. एकंदरींत, हा करमणुकीचा प्रकार जनसमूहाच्या शारीरिकसंपत्तिदृष्ट्या अतोनात फायद्याचा आहे. ह्या प्रकारामुळें करमणूक करून घेणाऱ्यांचा किंवा इतरांचा-कोणाचाहि तोटा न होतां, उलट, करमणुकींत खर्चिलेला काळ सार्थकीं लाविला जात असतो. ह्या प्रकारानें मनावर कोणताहि वाईट परिणाम न होतां, मन सुदृढ, भक्कम, आनंदी व कार्यक्षम होतें.

## प्रकार २ रा.

दुसऱ्याहि एका प्रकारानें मनाला करमणूक करून घेतली जाते. पत्ते, बिझिक्, पतंग, जुगार, बिलियर्ड, सोंगट्या, बुद्धिबळें, वगैरे ह्या प्रकारांत येतात. ह्या प्रकारापासून मनाला तातपुरती करमणूक होते, पण ती करमणूक आनंदपर्यवसायी असूं शकत नाहीं. पहिल्या प्रकारापासून मिळणारा शुद्ध व स्वच्छ हवेचा फायदा ह्या प्रकारापासून मिळत नाहीं. शरीराला तो पोषक नसून शोषकच असतो; व निरीक्षणपूर्वक पाहि-ल्यास तो मनालाहि पोषक नसतो. शरीराला आळस व कामांत व्यत्यय

आणणारा हा प्रकार होय. निरनिराळ्या व्यसनांना जन्म देणारा हा प्रकार आहे. खरोखर, श्रांत मनाला विश्रांति देण्यास हा प्रकार मनुष्य उपयोगांत आणीत नाहीं; तर, अष्टौप्रहर व रात्रंदिवस लोक त्याच्या मागें लागलेले असतात. कामधाम, जेवणखाणहि कित्येकांना ह्याच्यामुळें सुचत नाहीं. बरें, वेळ सत्कार्यीं लागतो ह्मणावें, तर, तसा ह्मणण्यासारखा ह्यापासून फायदाहि नाहीं. उलट, सर्वतोपरी, तोटाच! बुद्धिबळें, सोंगट्या ह्या खेळांत कांहीं अंशीं बुद्धीचा उपयोग तरी करावा लागतो. बाकी, इतर खेळांत तोहि फायदा नाहीं. पत्ते, बिझिक् यांच्यामुळें तर कांहींच फायदा होत नाहीं. वेळ निरुद्योगीपणांत जातो, एवढेंच. ह्या खेळांत मनाच्या किंवा शरीराच्या कोणत्याच शक्तींना काम नसतें. ह्या खेळापासून आरंभ होऊन त्याचें पर्यवसान आळसांत व व्यसनांत होतें; व शेवटीं जुगारीचा भयंकर नाद लागतो. ह्या व्यसनांत सुशिक्षितहि असतात. किंबहुना, त्यांचे ह्या जुगाराकरितां चोरीछपीचे अड्डेहि असतात. करमणुकीच्या ह्या प्रकारांना किती सुशिक्षितांचीं व अशिक्षितांचीं घरें बळी पडलीं असतील, तें एक त्या परमात्म्यास ठाऊक! त्याच प्रकारची सुधारून वाढविलेली आवृत्ति–घोडयाच्या शर्यती ऊर्फ राजरोस चालत असलेला जुगार, ही होय. ह्या करमणुकीच्या प्रकारानें कोणताहि फायदा तर होणें शक्य नाहींच; पण उलट, उद्योगानें मिळविलेले पैसे व्यर्थ दवडण्याचें मात्र तें एक साधन आहे. हा मोठमोठ्या श्रीमंत लोकांचा करमणुकीचा प्रकार होय. ह्याकरितां रेल्वेना स्पेशल गाडया काढाव्या लागतात. अशिक्षितांचा जुगार–पत्ते, गोट्या व काजूच्या बियांवरहि बसलेला असतो. लहान मुलें गोट्या, काजू खेळून स्वतःची करमणूक करितात व कांहीं अंशीं लहानांना लहानपणीं ती फायद्याची असते. पतंगाचा नाद तर–लहान-मोठे, सुशिक्षित–सर्वांनाच असलेला दृष्टीस पडतो. पतंगानेंसुद्धां एवढा फायदा नसतो, व तो वेळ चांगल्या कामीं लाविला असें होत

नाहीं; पण शरीराला मोकळी हवा मिळते, एवढें मात्र खरें. बिलियर्ड हासुद्धां सोंगट्या-पटासारखा घरांतलाच खेळ आहे.

## प्रकार ३ रा.

करमणूक करून घेण्याचा आणखी एक प्रकार आहे; व त्यांत गायनवादनाचे क्लब, नाटकें, तमासे, जलसे, वादविवादाचे क्लब, रजेंतल्या सफरी, शाळांचीं व कॉलेजांचीं संमेलनें, वार्षिक मेळे, भजनें, मेजवान्या, सिनेमाटोग्राफ, इत्यादि गोष्टींचा समावेश होतो. ह्या प्रकारांत विशेष हा आहे कीं, फार मोठ्या जनसमूहाची एकदम करमणूक होते. वरील गोष्टींमुळें एकमेकांचें दळणवळण वाढतें व करमणुकीबरोबर आणखी इतर पुष्कळ गोष्टी साधल्या जातात. वरील दोन्ही प्रकार व्यक्तिशः करमणूक करून घेण्याच्या प्रकारांत येतात व हा प्रकार सार्वजनिक-रीत्या करमणूक करून घेण्याचा होय, असें सहज ह्मणतां येईल. गायन-वादनाच्या क्लबांमुळें मनाला उत्तम प्रकारची करमणूक होऊन, शिवाय, गायन व वादन ह्या कलाहि अवगत होतात. एखाद्या विशिष्ट प्रसंगीं घरींदेखील कांहीं लोक नायकणीच्याकडून किंवा गवयाकडून गायन करवून, आपली व आपल्या मित्रमंडळीची करमणूक करून घेतात. लग्नसमारंभ किंवा इतर कोणत्याहि समारंभानंतर मनोरंजन करण्याचा वरील रीतीचा प्रघात आहे. घरीं स्वतःहि गायनवादनाचें साहित्य जमवून लोक स्वतःची करमणूक करीत असतात गायनादिकापासून मन चांगल्या स्थितींत राहतें; मनाचें दुर्मुखलेपण नाहींसें होतें. नाटकापासूनहि मनाची करमणूक होते. करमणूक होऊन, शिवाय, जगाचें चित्र व रोजचे व्यवहार त्यामुळें डोळ्यांसमोर मूर्तिमंत दिसत असतात. चांगल्यावाईटाची निवड करण्यास नाटक हा उत्तम धडा आहे. पण नाटकाचा अतिरेक ह्मणजे नाशाचा मार्ग, असें खुशाल ह्मणावें. नाटकापासून रोजच कोणी करमणूक करून घेऊं पाहील, त्यानें त्या

प्रकारापासून मुळींच दूर असावें, हें बरें. नाटकें, कादंबऱ्या, प्रहसनें व इतर पुस्तकें वाचून स्वतःची करमणूक करून घेतां येते. वाचन हें व्यक्तिशः करमणुकीचें मोठेंच साधन होय. तमासे, जलसे वगैरे रीतीनें अशिक्षित व खालच्या दर्जाचे लोक करमणूक करून घेत असतात. ह्या मनोरंजनांत पुष्कळदां सुशिक्षितहि आढळतात. हे प्रकार स्तुत्य नव्हत. त्यांनीं मनाला करमणूक तर विशेष होत नसतेच, पण मन मात्र अनीतीकडे व अश्लीलपणाकडे वाहवूं लागतें. कित्येक वेळां सुशिक्षित व वरच्या दर्जाचे लोकहि रात्रीच्या रात्री घालवून दौलतजादा करितांना व नाच्या पोऱ्याला जवळ घेऊन शेंकडों रुपयांचा फन्ना उडवितांना पाहून ह्या करमणुकींच्या प्रकारांचा किळस येतो! पत्ते, नाटकें वगैरेचा अतिरेक जसा मनोरंजनाच्या सदरांतून निघून सर्वस्वीं नाशकारक होतो, तसा तमासे, जलशादिकांचा अतिरेक सर्वस्वाची फार हानि करितो; इतकेंच नव्हे, पण ह्यांचा साधारण संबंधसुद्धां महा हानिकारक होय. पण तो एक मनोरंजनाचा मार्ग आहे, हें खास. दिवाळीसारख्या सणाच्या वेळीं जशी सात्विकपणानें ४।६ दिवस करमणूक व मनोरंजन करून घेण्याची आपली पद्धत असते, तशीच शिमग्यासारख्या सणाच्या वेळीं एकंदर अश्लीलपणाला मुक्तद्वार करून, अंगाला शेण-माती—रंग चोपडून, तामसी वृत्तीनें ४।६ दिवस करमणूक करून घेण्याची पूर्वापार गलिच्छ पद्धत आपल्यांत आहे! नुकतेंच माझ्या वाचण्यांत आलें कीं, इंग्लंडांत एका गांवीं त्यांच्या एका शिमग्यासारख्या सणाच्या दिवशीं तरुणमंडळीं, रस्त्यांत जमून, वाटेंतून जाणाऱ्या प्रत्येक स्त्रीचा, कुमारिकेचा प्रत्येकानें मुका घेतल्याशिवाय तिला जाऊं देत नसत. हे सर्व करमणुकीचे प्रकार खरेच; पण हे अमानुष, अतएव राक्षसी वृत्तीचे, अर्थात् अनीतीचे होत. ह्मणून ते अगदीं त्याज्य समजावे. अशा प्रकारची करमणूक ज्या दिवशीं जगांतून नाहींशी होईल तो सुदिन खराच. पण तो सुदिन खात्रीनें उगवेलच, हें मात्र खरें नव्हे. कारण,

दा. क्र. ........

तामसी वृत्ति जगांत कोठेंना कोठें अस्तित्वांत असणारच असणार.

वादविवादाचे क्लब, सफरी, संमेलनें हे प्रकार सात्विकपणाचे होत. ह्या प्रकारांनीं होणारें मनोरंजन सात्विक प्रकारचें होऊन, त्यामुळें दुसरेहि अनेक लाभ होतील. ज्ञानप्राप्ति हा मोठा लाभ ह्या करणुकी-पासून होतो. त्रासदायक झालेले तास, वादविवादाच्या क्लबांत, आपल्या मित्रांच्या सहवासांत व वादविवादांत, आनंदांत जातात. करमणूक होऊन निरनिराळ्या विषयांचें ज्ञान होतें तें निराळेंच. ह्या प्रकारामुळें वेळ व्यर्थ असा मुळींच जात नाहीं. एका महान् विद्वानाची मनोरंजन करून घेण्याची पद्धत 'विषयाची पालट' एवढीच होती. तशीच ही पालटच होय. शिवाय, परस्परप्रेमहि त्या प्रकारांत साधितां येतें. पत्ते, बिझिक् वगैरे प्रकारांच्या वेळीं परस्पर वितुष्ट मात्र पडत असतें. एक लेखक ह्मणतोः–A good talk ! It is an admirable tonic food both for body & mind '–अक्षरशः खरें आहे. शरीर व मन ह्या दोहोंनाहि त्यामुळें हुशारी मिळते. निरनि-राळ्या जागीं एकानें व पुष्कळदां अनेकांनीं प्रवास करणें हें मनोरं-जनाचें फारच उत्तम साधन होय. कॉलेजांतले किंवा शाळांतले विद्यार्थी आणि शिक्षक अशा सफरीवर जात असतात. इतर लोकहि, लेणीं किंवा प्रसिद्ध ऐतिहासिक स्थलें, किल्ले वगैरे पाहण्यास जातात. ह्या प्रकारामुळें, व्यवसायांमुळें त्रासलेल्या मनाचें रंजन फारच उत्तम तऱ्हेनें होतें; अनेक प्रकारची माहिती मिळते; निरनिराळे देश, वेष पहावयास सांपडतात; अनुभव येतो; अशा सफरीनंतर मन व शरीर अगदीं ताजे-तवानें, प्रफुल्ल व नव्या उमेदीचें बनतें; निरनिराळ्या देशांच्या हवापा-ण्यामुळें शरीरावर चांगलाच परिणाम होतो; जगाबरोबर कसें वागावें व जग ह्मणजे काय, हेंहि नीट कळतें; व दळणवळण वाढतें. कांहीं लोकांनीं मिळून हा मार्ग नेहमीं अमलांत आणिल्यास ती फार उत्कृष्ट प्रकारची करमणूक होईल. शाळांचीं, कॉलेजांचीं व इतर क्लबांचीं

किंवा समाजांचीं संमेलनें वर्षांनें किंवा अशाच कांहीं ठराविक मुदतीनें भरत असतात. त्यावेळीं मनाला निराळी दिशा मिळाल्यामुळें, वा स्वैर-संचार करण्यास मिळाल्यामुळें, तें आनंदांत असतें; नेहमींच्या कष्टतर व एकच्याएकच मार्गक्रमणामुळें त्याच्यांत आलेला कमीपणा भरून निघतो. सामाजिक उन्नति व विश्वबंधुत्व वाढविण्यास हे प्रकार मोठेच फाय-द्याचे होत. वर्षानंतर किंवा अशाच ठराविक मुदतीनंतर संमेलनादिका-पासून प्राप्त होणारा स्वैरसंचाराचा आनंद एक मनासच ठाऊक. हे प्रकार नित्य करमणुकीचे नव्हत; तर, नैतिक करमणुकीचे ह्मणजे प्रसंगविशेषाचे होत. वार्षिक मेळे, मेजवान्या हेसुद्धां मुदतीचेच प्र-कार होत. ह्या करमणुकीच्या प्रकारांना मुदत व जनसमूह ह्यांची जरूर असते. अशिक्षितजनसमूह भजनें वगैरे करितात, त्यांतसुद्धां मुख्य मुद्दा करमणुकीचाच असतो. त्यांच्या भजनांतील भक्ति पार पळालेली असते. गायनाचा छानशोकीपणाच मात्र त्यांत उरलेला असतो. वरील विवेचनांत एवढें दिसून येईल कीं, कांहीं मार्ग नित्यशः करमणुकीचे आहेत; कांहीं ठराविक मुदतीचे आहेत व त्याप्रमाणें त्यांचे फायदेतोटे निरनिराळे व विविध आहेत; कांहीं मार्ग व्यक्तिशः मनोरं-जनाचे आहेत, व कांहीं सहकारी रीतीनें मनोरंजन करून घेण्याचे आहेत. व्यक्तिशः मनोरंजनांत एका व्यक्तीच्या मनाचें आराधन होतें, तर, सहकारीत्वांत व्यक्तींचें आराधन होऊन अनेकांचेंहि होतें, व त्या-मुळें समाजासहि फार मोठा फायदा होतो.

## प्रकार ४ था.

आणखी एका तऱ्हेनें लोक मनोरंजन करीत असतात. त्या मनोरंज-नाच्या मार्गविशेषांत खालच्या वर्गांतील लोकांचा विशेष भर असतो. अफू, गांजा, चरस, विडी, दारू व बाहेरख्यालीपणा वगैरे प्रकार आरा-धन करणाऱ्या त्या त्या भक्तांची करमणूक क्षणैक करितात; पण हे

प्रकार 'व्यसन' ह्या सदराखालीं येतात. करमणुकीकरितां ह्मणून आरंभीं हे प्रकार लोकांत शिरतात; पण पुढेंपुढें ते बळावत जाऊन त्या ठिकाणीं कायमचें बिऱ्हाड करून बसतात. ह्या प्रकारांनीं त्या भक्तांच्या इभ्रतीची राखरांगोळी केलेली असते. जसे हे व्यक्तिशः अमलांत आणिलेले असतात, त्याप्रमाणें ह्या व्यसनी मंडळीचे अड्डेहि असतात. हे अड्डे विशेषतः बैरागी, तडीतापडी ह्या लोकांचे देवळांत किंवा फिरते दृष्टीस पडतात. विडी ही तर सामान्यत्वेंकरून करमणूक करून घेण्याचें साधन ठरलेली आहे. लहानापासून थोरापर्यंत ती एक महत्वाचें सहज खेळणें झाली आहे. दारू हीसुद्धां तितकीच सर्वत्र पसरलेली आहे. कामगार लोकांचा विडीमुळें कामाचा थकवा थोडा वेळ नाहींसा होतो, असा, त्यांच्या समजुतीप्रमाणें, हा एक फायदा आहे; परंतु दारूमुळें तसा फायदा नसतांनाहि ती फारच बोकाळली आहे. बाहेरख्यालीपणाहि तितकाच अमलांत आलेला आहे. कांहीं श्रीमंत व सुशिक्षित लोकांतहि 'टी–क्लब' ह्या नांवाखालीं वरील प्रकार रुढ झालेले आढळतात. त्यावेळीं मात्र मनाच्या ह्या ठेवणेचें आश्चर्य वाटतें! त्यांच्या त्या मनाराधनेच्या प्रकारांत वरील सर्व व्यसनें प्रामुख्यानें वावरत असतात. असल्या एखाद्या 'क्लब' मध्यें गेल्यास, त्यांची ओळख नसलेल्या मनुष्याची स्थिति अगदीं चमत्कारिक होते. त्या क्लबांतलें मुख्य मनाराधनेचें साधन 'जॉनहेग'ची अस्सल दारू–व वेळाप्रसंगीं नायकीणींचे नाच, त्यांच्या बैठकी—हीं चालू असतात. करमणूक करून घेण्याच्या ह्या अश्लील प्रकारांपासून किती लोकांच्या शरीराचे, आयुष्याचे व कुटुंबाचे धिंडवडे निघत असतात, तें एका सर्वसाक्षी परमेश्वरालाच ठाऊक! ह्या अश्लील प्रकारांपासून शेवटीं मनाचें आराधन न होतां, अधोगति हाच त्याचा शेवट!! एकंदरींत, मनाचा थकवा नाहींसा करण्याला, मन प्रेमी बनविण्याला व मनाची खर्च झालेली

शक्ति पुन्हां मिळविण्याला करमणुकीचे एकंदर प्रकार निरनिराळ्या स्थितिप्रमाणें आवश्यक आहेत.

## करमणुकीपासून सामान्यत्वें फायदे व तोटे

पहिल्या प्रकारांत सांगितलेले प्रकार शरीराला, मनाला-दोहोंना फायदेशीर आहेत. त्या प्रकारांचा अतिरेक होण्याचा फारसा संभव नसल्यामुळें त्यापासून विशेष तोटा होण्याचा संभव नाहीं. पहिल्या प्रकारांत शरीराला व मनाला जितक्या प्रमाणांत फायदा होतो, तितक्या प्रमाणांत बुद्धीलाहि होतो; पण, दुसऱ्या प्रकारांत नुसत्या बुद्धीलाच काय तो थोडासा फायदा होतो. मनाचें रंजन होण्यापलीकडे त्यामुळें विशेष फायदा होत नाहीं. मात्र त्याचा अतिरेक झाल्यास वेळाचा व पैशाचा व्यर्थ नाश होण्याचा संभव असतो व नेहमीं तसाच प्रकार घडतो. तिसऱ्या प्रकारामुळें ज्ञानप्राप्ति, महत्वाची माहिती, परस्पर दळणवळण व प्रेम इत्यादि फायदे होण्याचा प्रसंग असतो; व त्यांचा अतिरेक होण्याचा मुळींच संभव नाहीं; अर्थात् तोटे मुळींच होत नाहींत. मात्र तमासे, नाटकें इत्यादिकाच्या अतिरेकापासून तोटे होण्याचाच संभव आहे. एकंदरींत, मनोरंजन होऊन आयुष्यांतले मोठमोठे धडे शिकण्याची संधि ह्या प्रकारापासून मिळते. चवथा प्रकार नुसत्या तोट्यांनींच व्याप्त असल्यामुळें मुळींच त्याज्य होय. पांचव्या प्रकारामुळें करमणूक होऊन ज्ञानवृद्धीसहि मदत होते. लहान पिढीच मोठी व्हावयाची असते; अर्थात् लहानपणीं जें बीजारोपण होईल तेंच खरें. ह्मणून, खेळाविषयीं ड्यूक ऑफ् वेलिंगटन् काय ह्मणतात तें खालीं देऊन, स्त्रीसमाजाच्या मनोरंजनाच्या प्रकारांकडे वळतों. "The Duke of Wellington truly said that the battle of Waterloo was won in the playing-fields of Eton. Many of the best & most useful lessons of public schools are those which the boys learn in the playing-ground."

## आणखी एक प्रकार

हल्लीं आमच्यांत करमणूक करून घेण्याचा एक प्रकार फारच जोरांत आहे. तो प्रकार लहानांत वा मोठ्यांत, तरुणांत वा वृद्धांत, सुशिक्षितांत वा अशिक्षितांत, श्रीमंतांत वा गरिबांत, स्त्रियांत वा पुरुषांत—सरसहा झाडून सर्वांत—दृष्टोत्पत्तीस येतो. कोठेंहि पहा—घरांत, दारांत, रस्त्यांत, स्टेशनांत, बाजारांत, पाणी भरतांना विहिरीवरसुद्धां, गप्पा व गोष्टी ऐकूं यावयाच्याच. दोन माणसें एकत्र झालीं कीं, झालें त्यांचें आपापल्या योग्यतेप्रमाणें गाडें सुरु. त्या गप्पांत विशेष तथ्य नसावयाचें; पण त्यामुळें मनाला विलक्षण प्रकारची करमणूक होते व समाधान प्राप्त होतें. हे करमणुकीचें साधन इतकें सोपें आहे कीं, त्याला कोणत्याहि प्रकारची सामुग्री लागत नाहीं. अगदीं अनोळखी मनुष्य कां होईनात ! ते दोघे एकत्र कांहीं वेळ राहिले कीं, झालीच सुरुवात. करमणुकीच्या दुसऱ्या सर्व उपायांच्या अभावीं हा उपाय फारच उत्तम. त्यापासून कांहीं विशेष तोटा नाहीं—मात्र सामान्य रीतीची इतरांची निंदा वा स्तुति इतकें मात्र ह्या प्रकारांत अंतर्भूत आहे. ह्या प्रकाराइतकाच सामान्य व ह्यालाच अनुषंगून असणारा दुसरा प्रकार ह्मटला ह्मणजे फेरफटक्यास जाणें हा होय. प्रत्येक शहरांतून बाहेर हवेवर जाणाऱ्या लहानथोरांकडे पाहिल्यास, आपल्याला वरील प्रकाराच्या करमणुकींची योग्य अटकळ होईल. मुंबईस ब्याक्‌बेकडे, पुण्यास पर्वतीकडे किंवा चतराशिंगीकडे, तरुणांचे वा वृद्धांचे गप्पा करीत आनंदांत चाललेले मेळे अवलोकन करावे. ब्याक्‌बेवर एखादी संध्याकाळ घालविणाऱ्याला तिकडे आनंदाची किती लूट चाललेली असते तें दिसून येईल. लहान मुलांचे थवे आनंदानें रेतीवर बागडत आहेत; पाण्यांत धांव घेत आहेत; तरुणांचे मेळे आपल्या संवगड्यांचीं वर्तुळें करून आनंदांत गप्पा करीत हंसतखिदळत आहेत; एखाद दुसरे वृद्ध, पोक्त गृहस्थ एखाद्या विषयावर

बोलत बोलत शतपावली करीत आहेत; कांहीं त्या एकंदर गंभीर देखाव्याचे मनन करीत आहेत; कितिएक प्रणयी युवयुवती हातांत हात घालून आनंदानें प्रेमाच्या गुजगोष्टी करीत आहेत; एकंदरीत, मनाला उल्हसित करण्याला व थकवा नाहींसा करण्याला अशा जागा व असें फिरणें फारच उपयुक्त होय. अनेक वेषांच्या व जातींच्या स्त्रियाहि त्या प्रकारांत भाग घेण्यास तिकडे आलेल्या व आनंदानें हवेचा उपभोग घेत असलेल्या दिसतात.

## स्त्रियांचे करमणुकीचे प्रकार

स्त्रियांचे मनोरंजन करून घेण्याचे प्रकार बहुतेक घरांतले (indoor) असतात; कारण, आमचा स्त्रीवर्ग अद्यापपर्यंत पुरुषांसारखे बाहेरचे (out-door) करमणुकीचे प्रकार अस्तित्वांत आणण्याइतका निर्भीड झाला नाहीं. हल्लीं पुष्कळ शिकलेल्या स्त्रिया पुरुष-समाजांत मिसळलेल्या असतात. पण पुरुषांच्या करमणुकीच्या प्रकारांत मिसळण्याइतकें, अथवा तसे प्रकार स्वतः अमलांत आणण्याइतकें, अमृदुत्व त्यांनीं आपल्या अंगीं आणिलें नाहीं. ह्मणून त्यांचे पूर्वीपासून करमणूक करून घेण्याचे मार्ग आजहि बहुतांशीं तेच आहेत. परिस्थितीचा विशेष परिणाम त्यांच्या खेळांवर झालेला नाहीं. सुशिक्षित स्त्रियांतहि तसा कांहीं प्रकार घडून आलेला नजरेस येत नाहीं. आमच्या भगिनी ज्या सात्विक प्रकारांनीं आपलें मनोरंजन करीत असत, त्याच सात्विक प्रकारांनीं आजहि त्या आपलें मनोरंजन करून घेतात.

## सामान्य विवरण

आमच्या शिकलेल्या भगिनी व न शिकलेल्या विद्वानांच्या पत्न्या, शुद्ध हवेवर फिरण्याचा मार्ग पुष्कळच अंशीं पसंत करूं लागल्या आहेत. तरुण मुलीहि ब्याक्‌बेसारख्या ठिकाणीं, किंवा एखाद्या बागेकडे (garden) जातांना आढळतात. तरुण मुलींचा तो घोळका पाहून व त्यांच्या आनंदांत चाललेल्या गप्पागोष्टी ऐकून कोणाच्या मनाला

कौतुकच वाटेल! त्या पद्धतीनें मुलींची चांगली करमणूक होते; त्यांना शुद्ध हवेचा व उजेडाचा फायदा मिळून त्यांच्या शरीरप्रकृतीवरहि चांगला परिणाम होतो. आपापल्या मैत्रिणी भेटल्यामुळें त्यांना विशेष आनंद होत असला पाहिजे. पण स्त्रियांच्या फिरावयास जावयाच्या जागा, पुरुषांच्या फिरावयास जाण्याच्या जागांहून निराळ्या असल्यास, मला वाटतें, स्त्रिया जास्त स्वच्छंदानें वागावयास–हंसण्याखिदळण्यास–त्यांच्या मनोवृत्तींना स्वैरपणानें विहार करावयास–मिळेल; व पुरुषांच्या दृष्टीसमोर असल्यामुळें उत्पन्न झालेला संकोच नाहींसा होऊन स्वतंत्रतेचा सुखास्वाद चाखावयास मिळेल. ह्या प्रकारापासून स्त्रियांच्या अंगीं भलताच निर्भीडपणा येतो असें कांहीं म्हणतात, व त्यांत अगदींच तथ्य नाहीं असें म्हणवत नाहीं. अशा प्रकारापासून कदाचित् अनिष्ट प्रकार घडण्याचा संभव आहे; पण त्या प्रकारापासून स्त्रियांच्या मनावर व शरीरावर इष्ट परिणाम घडण्याचाहि तसाच संभव आहे.

मुलींच्या शाळांचींही संमेलनें हल्लीं भरलीं जात असतात. महिलापरिषदांसारख्या परिषदाहि स्त्रिया चालवितात. अशा रीतीनें आपल्या घरकुलांतून बाहेर पडून मनाचा संकोचितपणा नाहींसा करितात. त्यामुळें त्यांचीं मनें नेहमीं सुप्रसन्न असतात. अशा प्रकारापासून मनाला, शरीराला जो फायदा व्हावयाचा तो पूर्णपणें होतो. मात्र स्त्रियांच्या ह्या स्वतःची करमणूक करून घेण्याच्या प्रकारांचा अतिरेक, बॉलसारख्या व ह्याच धर्तीवर दुसरें एखादें गोंडस नांव असलेल्या मनोरंजनाच्या प्रकारांत न होवो म्हणजे झालें. फार पुढें गेलेल्या कांहीं स्त्रियांच्या हिंडण्याफिरण्याच्या प्रकारांचा संसर्ग इतर स्त्रियांना व तरुणींना न लागावा, पुरुषांच्या कपटाचरणांत ह्या फसल्या जाऊं नयेत, एवढी खबरदारी घेतल्यास वरील रीतीनें, खुल्या मार्गानें, स्त्रियांनीं आपल्या मनाची करमणूक करून घेतल्यास अनिष्ट नाहीं.

शरीराला व्यायाम देणारे प्रकार स्त्रियांमध्यें ज्याप्रमाणें ग्रीसमध्यें पूर्वीं होते, जपानांत हल्लीं आहेत, त्याप्रकारचे व्यायाम आमच्या स्त्रि-

यांत नाहींत हें खरें; परंतु पूर्वी ते बरेच रुढ होते असें दिसतें. पुष्कळ स्त्रिया पौराणिककालीं युद्धकला, सारथ्य शिकलेल्या होत्या. ऐतिहासिक-कालींहि रणांगणांत अश्वविद्या, शस्त्रविद्या इत्यादि पौरुषेय विद्यांत रजपूत-रमणी, महाराष्ट्रीय-बाला आपलें नैपुण्य व योग्यता दाखवीत. दामोदरगुरूंच्या कालींहि कुस्तींत प्राविण्य मिळविलेली एक स्त्री गांवो-गांव विजय मिळवीत फिरत होती, अशी एक आख्यायिका ऐकूं येते. पण हल्लीं मात्र तशा प्रकारचे करमणुकीचे प्रकार आपणांत रुढ नाहींत.

स्त्रियांत वरील जातीचे करमणुकीचे प्रकार प्रचलित नाहींत; परंतु आमच्या मुलींत मात्र तसले प्रकार आहेत. फुगड्या, सुटमिट, पिंगा, झिम्मा वगैरे प्रकारांपासून मुलींच्या शरीरावर चांगला परिणाम होतो. सारीपाट, झेलखडे, बाहुल्यांचा संसार इत्यादि प्रकारांपासून चांगलीच करमणूक होते. बाहुल्यांचीं लग्नें वगैरे खेळ पाहतांना त्यांना पाहणाऱ्यांस मुलींच्या अंगच्या अनुकरणशक्तीचें कौतुक करावेंच लागतें. बाहुल्यांच्या संसाराच्या खेळांत त्यांच्या पुढील आयुष्याचें पडलेलें प्रतिबिंब सुरेख दिसतें. स्त्रियांनीं करमणूक करून घेण्याचा मुख्य मार्ग ह्मणजे कामधाम आटोपल्यावर, फावल्यावेळीं, गोष्टी करीत बसणें हा होय. दुपारच्या वेळीं चार शेजारिणी गोष्टी करीत एकत्र सांपडावयाच्याच. त्यांत तथ्य "मासोळ्या असल्या कधीं घडविल्या बाई हुबेहूब या ?" या नमुन्याचेंच असावयाचें. दोनप्रहरानंतर पुराणाला जाणें म्हणजे करमणूकच होय. वरच्या वर्गांतल्या व खालच्या वर्गांतल्या-सर्व बायांना करमणूक करून घेण्याचा वरील प्रकार सामान्य होय. कांहीं सुशिक्षित स्त्रिया आपला वेळ वाचनांतहि घालवितात. मागें एका ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें स्त्रियांची करमणूक ज्ञानवर्धकहि असते.

मंगळागौरी, वसंतपूजनें, हळदीकुंकु वगैरे प्रकार करमणुकीचेच होत. पुरुषांना संमेलनादिकांपासून जो फायदा होतो, त्याच प्रकारचा फायदा स्त्रियांना वरील प्रकारांपासून होतो. स्वच्छ हवा, मनाची रोजच्या

बंदिवासांतून सुटका, परस्पर ओळख, प्रेमवृद्धि इत्यादि फायदे त्यांना होतात. वसंतऋतूंतले हे प्रकार पाहिले ह्मणजे पुरुषांप्रमाणें स्त्रियांची योग्य ती सोय करणाऱ्या आमच्या समाजाबद्दल फार आनंद वाटतो. ह्या दिवसांत आपल्या बचड्यांना बरोबर घेऊन, शक्य त्या रीतीचा उत्तम शृंगार करून, आपल्या शेजारिणी पाजारिणी व मैत्रिणींसह आनंदानें बोलत व एकमेकींची विचारपूस करीत, एकमेकींकडे हळदीकुंकवाला लगबगीनें जातांना आमच्या भगिनींना पाहिलें ह्मणजे स्वर्गांतील स्त्री-साम्राज्य येथें अवतरलें आहे असें वाटतें; व आमच्या स्त्रियांच्या बंदिवासाचें वेळींअवेळीं तुणतुणें वाजविणारांची कींव येते !

पुष्कळ सुशिक्षित स्त्रिया आपला अमोल्य वेळ चांगल्या कामीं लावितात, असेंहि आपणांस आढळून येईल. फावल्या वेळीं कशीदा काढणें, रुमाल विणणें, वगैरे कलाकुसरीचीं कामें करून त्या आपल्या करमणुकीच्या वेळेचें योग्य चीज करितात. त्यांचा हा धडा इतर भगिनींनीं गिरविल्यास, मनाची करमणूक होऊन, लोकनिंदेंत निरर्थक खर्ची पडणारा वेळ सत्कार्यीं लाविला असें होईल.

## उपसंहार

असो. करमणुकीच्या प्रकारांचें निरनिराळें वर्णन न करितां नुसता नामनिर्देश करूनच एकंदरींत भागविलें आहे. कारण, प्रत्येक प्रकाराचें वर्णन निरनिराळें करणें ह्मणजे तो एक अति विस्तृत निबंध होणार; आणि आपणांजवळ स्थलाचा व कालाचा अभाव. तशांत, निबंधाची एखादीहि बाजू उगीच सुटली जाऊं नये, व तो सर्वांगानें पूर्ण व्हावा, ही तर इच्छा. तेव्हां, सामान्यत्वेंकरून ऊहापोह व गुणावगुणवर्णन करणें भाग पडलें आहे. ह्याबद्दल सज्जनवृंद क्षमाच करितील. आपल्या आयुष्यांतलीं जीं कांहीं प्रधान अंगें आहेत, त्यांपैकीं करमणूक हें एक आहे. अर्थात् एखाद्या महत्वाच्या विषयाइतकेंच त्याचेंहि महत्व आहे.

निबंधाचा हा विषय वाचल्याबरोबर कित्येकांना असें वाटलें असेल कीं, चांगलें ज्ञानवर्धक, बुद्धिवर्धक विषय सोडून हा कसला विषय निबंधाकरितां दिला ? पण ज्याप्रमाणें मनुष्याच्या आयुष्यांतल्या तेजस्वी भागाइतकाच—उमेदीच्या तारुण्याइतकाच—बालपणचा भाग महत्वाचा आहे; किंबहुना, लहानपण आहे ह्मणूनच तारुण्य, तसेंच करमणुकीचें महत्व, मनुष्याच्या आयुष्यक्रमांत आहे. असो. माझे हे वेडेवांकडे दोन शब्द गोड करून घेतले त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें! शेवटीं, त्या **जगच्चालकाचें** चिंतन करीत आपणां सर्वांची प्रेमपूर्वक मी रजा घेतों.

ॐ शांतिः ! शांतिः !! शांतिः !!!

ग्रंथालय
१.१.०६

# गजानन आणि दत्तात्रय,

मुंबरा येथील इमारतीच्या रेतीचे व्यापारी,

आणि

जी. आय्. पी. रेलवेचे कॉन्ट्र्याक्टर्स.

आमच्यांकडे मुंबरा येथील उत्तम प्रकारची रेती मिळते.

दर माफक.

# भास्कर मलीक आणि कंपनी,

डो, खांडकी, डबर, कोपीन, लादी, पाणथरा, हेदर, बाउंडरी वगैरे

इमारतीला लागणाऱ्या दगडांचे व्यापारी.

आमच्या कल्याण येथील खाणींत इमारतींना लागणाऱ्या हरएक

तऱ्हेचा उत्तम दगड निघतो.

दर माफक.

पत्ताः—घर नं. ७१,—१ली सुतार गल्ली,

गिरगांव, मुंबई.

खालील दोन नाटकें
लवकरच पुस्तकरूपानें व प्रयोगरूपानें प्रसिद्ध होतील.

११०८

प्रोज ] # राधाराधन [ अंक १–३

( वेश्यासंगदुष्परिणाम–नाटक. )

**स्थळें व देखावे**:—मुंबईतील. ह्याच बकाली–भ्रष्ट शहरांत हल्लीं अस्तित्वांत असलेल्या सामाजिक परिस्थितीचें, अंशतः परंतु तंतोतंत, दिग्दर्शन
**कथाभाग**:–एका भोळ्याबाभड्या श्रीमंत व तरुण पदवीधरानें—आपल्या धू व कावेबाज लंगोटीयाराच्या वाग्मोहनीजालांत सांपडून **राधा** नांवाच्या रंडीच्य नकली प्रेमपाशांत बद्ध झाल्यामुळें—स्वतःच्या इभ्रतीची, संसाराची, घराद राची व शरीराची अखेर राखरांगोळी करून घेतली, या गोष्टीचें चित्र.

———:o:———

# संगीत दमयंती

( पौराणिक नाटक. )

[ हें नाटक मुंबापुरवासी **श्रीगुरुदत्तप्रासादिक नाटक मंडळीस** कांहीं अटींवर रंगभूमीवरील प्रयोगाकरितां देण्याचें सध्यां ठरविलें आहे. ]

—आत्माराम मोरेश्वर पाठारे,
दादर—मुंबई, नं. १४.

REFBK-0001109

Printed by Mr. M. Ganpatrao at his 'Premier Art Printing Works,'
11, Cowasji Patel St., Fort, Bombay & published
by Mr. Gajanan Govind Naik,
at Chendni, Thana.